# महाराष्ट्रातील ग्रामिण भागातील महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासातील योगदान

**प्रा.डॉ. धनंजय गभणे**
ग्रंथपाल
समर्थ महाविद्यालय, लाखनी, त. लाखनी, जि. भंडारा
Email – dr_gabhane@rediffmail.com
Mob. – 9423640251

**सारांश :**

'व्यक्तिमत्व' हा शब्द मुळातच ग्रीक भाषेतील 'पर्सोना' या शब्दातून आलेला आहे. पर्सोना म्हणजे मुखवटा. परंतु मुखवटा म्हणजे एखादयाचे अनुकरण करण्यासाठी त्यांच्यासारखे स्वत:ला बनविने किंवा एखादया विशिष्ट व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचा मुखवटा पांघरणे असे म्हणता येईल. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाविषयी बोलायचे झाल्यास त्यांच्या विकासासाठी अनेक घटक कारणीभूत असतात. शालेय जीवनापासूनच तर अगदी पदवी व पदव्युत्तर वर्गापर्यंत विद्यार्थ्यांच्या समाज, शिक्षक, पालक, सहविद्यार्थी अशा अनेक घटकांशी संबंध येत असतो. या घटकांच्या सहवासात त्यांचे व्यक्तिमत्व घडत जाते. परंतु व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडविण्यासाठी काही घटकांची भूमिका फारच महत्वाची ठरते. शहरी भागातील विद्यार्थ्यांना बऱ्याच सुखसुविधा व संसाधनाची उपलब्धता असते त्यामानाने ग्रामीण विद्यार्थी मागे पडतो. व्यक्तिमत्व विकास म्हणजे केवळ बाहयरूप चांगले दिसणे नव्हे तर आंतरबाहय दोन्ही गुणाचा विकास एकत्रीत साधणे होय. व्यक्तिमत्व विकासाचे विविध पैलू वा कसोटया आहेत. प्रत्येक कसोटी आपले व्यक्तिमत्व बनविण्यात सक्षम आहे. असे करण्यासाठी काय करावे लागेल वा त्यात ग्रंथालयाचे योगदान कसे महत्वाचे आहे याचा परामर्श या लेखात लेखकाने घेतलेला आहे.

सदर संशोधन लेखात महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा विचार केलेला आहे. महाविद्यालयातील ग्रंथालय हे त्या महाविद्यालयाचा आत्मा असते. विद्यार्थी वर्गातील अध्ययनासोबत ग्रंथालयातील ज्ञानस्त्रोतांचा वापर करून आपली ज्ञानलालसा तृप्त करू शकतात व वाचनातून त्यांचे व्यक्तिमत्व घडण्यास मदत होवू शकते. प्रस्तुत लेखात याच पैलूवर तपशीलवार चर्चा करण्यात आली आहे.

व्यक्तिमत्व ही संज्ञा मुळातच एखादया व्यक्तिचे सर्वगुणसंपन्न होण्याचे परिमाण दाखवू शकते. व्यक्तिमत्व विकास म्हणजे निव्वळ एखादयाचे अनुकरण करून तसे दिसण्यासाठी प्रयत्न करणे नसून आंतर–बाहय दोन्ही रूपाचे एकत्रीतपणे सकारात्मक प्रकटीकरण होय. यात व्यक्तिचे दिसणे, बोलणे, चालणे, संभाषण कला, लेखनकला, विषयाचे ज्ञान यासारख्या सर्वच बाबींचा विकास साधावयाचा असतो. एखादी व्यक्ति बाहयरूपाने खूप सुंदर दिसत असेल पण चांगले बोलता येत नसेल तर तो त्याच्या व्यक्तिमत्व विकासाच्या आड येते.

व्यक्तिमत्व विकासाचे ठळकपणे खालील पैलू दिसून येतात.

- व्यक्तिचे बाहयस्वरूप (बाहयप्रकटन)
- संभाषण चातुर्य
- लेखन कौशल्य
- वाचन कौशल्य

- श्रवण कौशल्य

महाविद्यालयीन विद्यार्थी शिक्षण घेत असतांना प्राध्यापक, वर्ग मित्र, महाविद्यालयातील अन्य कर्मचारी यांच्या संपर्कात तर येतातच परंतु महाविद्यालयातील उपलब्ध सेवासुविधांचा ते लाभ घेत असतात. त्यात मुख्यत्वे ग्रंथालयाचा समावेश होतो. ग्रंथालय ही ज्ञानाची सदावर्ते आहेत. ग्रंथ हेच आपले खरे गुरू आहेत असे लोकमान्य टिळक यांनी म्हटले होते.

ग्रंथ असावे उत्तम हाती
हेच आपले सखे सोबती
ग्रंथाविन नाही शिक्षण
विद्यार्थ्यांचे हे खरे आभुषण

याप्रमाणेच ग्रंथासारखा दुसरा मार्गदर्शक नाही. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तर ग्रंथावर अमर्याद प्रेम केले. खऱ्या अर्थाने ते ज्ञानपिपासू होते असे म्हणावयास हरकत नाही.

ग्रंथालय ही आता आधीसारखी ग्रंथभांडार राहिलेली नसून ते ज्ञानाची स्त्रोत झाली आहेत. माहिती व तंत्रज्ञानाच्या या भरघाव वेगाने बदलणाऱ्या युगात ग्रंथालये सुद्धा मागे नाहीत, विविध नवनविन माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून नवनविन सेवा वाचकांच्या सेवेत हजर होत आहेत. सध्याच्या ऑनलाईन शिक्षणाच्या काळातही ग्रंथालयांची जबाबदारी आणखीनच वाढलेली आहे. ग्रामीण भागातील महाविद्यालयांची ग्रंथालये सुद्धा आता नॅक मुल्यांकनामुळे बऱ्याच प्रमाणात अद्यावत झालेली आहेत. अध्ययनासोबतच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात ही ग्रंथालये हातभार लावत आहेत. किंबहुना ती कशाप्रकारे उपयोगी पडू शकतात ते पाहू या.

**ग्रंथालये सेवा व सुविधा :**

**ग्रंथालयातील उपलब्ध ग्रंथसंपदा :**

कोणत्याही ग्रंथालयातील महत्वाच्या वस्तु म्हणजे तेथे उपलब्ध असलेली ग्रंथसंपदा होय. ग्रंथसंपदा म्हणजे ग्रंथसाठा नव्हे. याला संपदा यासाठीच म्हटले आहे. यात चरित्रे, आत्मचरित्रे, कादंबरी, कथासंग्रहे, कविता, ललितलेख, पत्रसंग्रह, नाटके यांसारख्या ग्रंथाचा संग्रह असला पाहिजे. अशाप्रकारच्या ग्रंथवाचनाने विद्यार्थी आपल्या ज्ञानात भर पाडू शकतात. चरित्रवाचनाने विद्यार्थ्यांच्या मनात विशिष्ट व्यक्तिमत्वाचा प्रभाव पडतो व तो त्याप्रमाणे आचरण करण्यात प्रवृत्त होतो. विद्यार्थ्यांच्या हाती चांगले पुस्तक पडले तर त्याच्या वाचनाने त्यांच्या व्यक्तिमत्वावर उत्तम प्रभाव पडू शकतो. वाचन कौशल्य निर्माण होते. म्हणून ग्रंथालयात उत्तमोत्तम ग्रंथसंग्रह कसा होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**वाचन अभिरूची वाढविणे :**

फक्त ग्रंथसंपदा वाढवून चालणार नाही तर ग्रंथालयशास्त्राच्या नियमाप्रमाणे प्रत्येक ग्रंथावर त्याचा वाचन मिळाला पाहिजे. ग्रंथालयात ग्रंथ दाखल झाला की ते विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देणे हे ग्रंथालयाचे कर्तव्य ठरते. त्यामुळे ग्रंथ हे अडचणीचे साधन न होता ते वाचकांच्या हाती पडणे आवश्यक आहे. यासाठी वाचनस्पर्धा, आयोजन करणे, ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करणे, ग्रंथचर्चेचे आयोजन करणे अशा कित्येक स्पर्धा, उपक्रम घेतले जावू शकतात. यामुळे जास्तीत विद्यार्थी ग्रंथालयाकडे आकृष्ठ होतील व परिणामी त्याची वाचन अभिरूची वाढेल, वाचनाने चित्तशुद्धी हसेते. 'वाचाल तर वाचाल' असे म्हटले जाते ते उगाच नव्हे. समर्थ रामदासानी म्हटलेच आहे की रोज काही तरी वाचावे. जो विद्यार्थी अभ्यासाबाबत विविध अन्य अवांतर वाचन करतो त्याची ज्ञानक्षमताही वाढते व तो उत्तमप्रकारे बोलू शकतो. जो उत्तम बोलतो त्याचे व्यक्तिमत्वही फुलून येते. वाचनकौशल्यातूनच संभाव्य कौशल्य निर्माण होते.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन :**

महाविद्यालयीन विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षामध्ये मागे पडताना दिसतात. याचे मुळ कारण म्हणजे मार्गदर्शनाचा अभाव. महाविद्यालयीन विद्यार्थ्याची उपस्थिती, पालकांची उच्च शिक्षणाबाद उदासिनता संसाधनाची कमतरता अशा अनेक बाबी याला कारणीभूत ठरतात. परंतु या स्पर्धेच्या व संगणकाच्या जगात 'जो थांबला तो संपला'. ग्रामीण भागातील विद्यार्थी बौद्धिक क्षमतेत मागे नसतात परंतु अपूरा व योग्य मार्गदर्शनाअभावी त्यांना दिशा गवसत नाही व अपयश पदरी पडते. ग्रंथालयामध्ये स्पर्धापरीक्षासंबंधी ग्रंथसंपदा तसेच नियतकालीके घेतली तर त्याद्वारे या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करता येईल. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षाचे मार्गदर्शन केंद्र सुरू केले व त्याद्वारे तज्ञांचे मार्गदर्शन, शिबिर, व्याख्याने, मुलाखत, मंत्र गुरूचर्चा तसेच सरावपरीक्षा जर आयोजित केल्या तर ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा यशस्वीपणे आपले जीवन घडवू शकतो. स्पर्धा परीक्षेच्या तयारीतूनच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्वही घडत जाते. त्यांचे ज्ञान अद्यावत होत जाते.

**आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाचा वापर :**

महाविद्यालयातील ग्रंथालयात संगणकाचा वापर जर असेल तर त्याद्वारे विद्यार्थ्यांना ग्रंथशोध प्रक्रिया समजावून देता येईल. ओपॅकच्या सहाय्याचे विद्यार्थी त्यांना हवा तो ग्रंथ शोधू शकतात. इंटरनेटद्वारे अन्य अभ्यासपुरक माहिती विद्यार्थी शोधू शकतात. यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होते. ग्रंथालयाद्वारे ऑनलाईन शिक्षणाची विविध मोबाईल ॲपस, गुगल अभ्यासरूपची माहिती देता येईल. त्याचबरोबर शिक्षण, नोकरी व व्यवसाय याबाबदची विविध वेबसाईटची माहिती देता येवू शकते. त्यामुळे विद्यार्थी विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थी जगातील कोणत्याही कोपऱ्यातील माहिती जाणून घेऊ शकतात. याद्वारे त्याच्या ज्ञानात भर पडून व्यक्तिमत्व विकासातही हातभार लावू शकते. विज्ञानाच्या विद्यार्थ्यासाठी N-LIST च्या आधारे विज्ञानातील विविध नियतकालीकांची माहिती प्राप्त करता येवू शकते. ग्रंथालयातर्फे ऑनलाईन माहिती स्त्रोत व त्यांचा वापर कसा करावा यासाठी प्रशिक्षण कार्यरूप आयोजित केले जाऊ शकतात. यामुळे विद्यार्थी ग्रंथालयापर्यंत मर्यादित न राहता विश्वातील प्रचंड महासागरात वावरू शकतात. यामुळे त्याचे व्यक्तिमत्व घडण्यास हातभार लागतो. वरील ठळक बाबीव्यतिरिक्त ही आणखी काही मुद्दे खालीलप्रमाणे विचारात घेतले तर ग्रामीण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात खऱ्या अर्थाने ग्रंथालये मदत करू शकतात.

- महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा 'वाचक मंच स्थापन करावा व त्याद्वारे विविध स्पर्धा जसे ग्रंथवाचन, लेखनकौशल्य, संवाद कौशल्य इ. राबवाव्यात.
- ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन परिसरातील दोन—तीन महाविद्यालये मिळून करावीत म्हणजे ज्ञानस्त्रोताची देवाण—घेवाण (रिसोर्स शेअरिंग) आपसुकच होईल.
- विद्यार्थ्यांमधूनच उत्साही विद्यार्थ्यांना 'वाचनदूत' म्हणून निवडावे. हे विद्यार्थी अन्य विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी प्रयत्न करतील जेणेकरून वाचन अभिरूची वृद्धींगत होईल.
- ग्रंथालयातर्फे व्यक्तिविकास संबंधी तज्ञ मंडळीचे मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करावीत. यातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होते. अर्थातच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिविकासात हातभार लावणारे खालील बाबी दृढ होण्यास मदत होते.

➢ संवाद कौशल्य
➢ नेतृत्व गुण
➢ नियोजन कला
➢ संघटन कौशल्य
➢ निर्णय क्षमता

- लेखन व वाचन कौशल्य
- अद्यावतपणा
- काळानुरूप बदलास तयार

एकंदरीत ग्रामीण भागातील ग्रंथालयांनी या सर्व बाबीचा विचार करून आपली सेवा अद्यावत, सक्षम व तयार राहण्यासाठी प्रयत्नरत राहणे आवश्यक आहे. ज्या सुविधा उपलब्ध आहेत त्याद्वारे विद्यार्थ्यांना लगेच मार्गदर्शन केले तर नक्कीच या भागातील विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकास उत्तमरित्या घडून येईल.

**संदर्भ :—**

- गभने धनंजय, व्यक्तिमत्त्व विकास तंत्र व मंत्र, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर २०१५.
- झेंडे जयप्रकाश, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट कोर्स, साकेत प्रकाशन, पुणे, २०१४.
- Roy, S.N. Personality Development, Prateeksha Publications, Jaipurs (India), 2014.